# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.05.2025** **वार- सोमवार**

---

**पाऊस**

मुंबई पुण्यासह सातारा, सोलापूर, रायगड जिल्ह्यात आज मुसळधार पाऊस सुरू आहे. पुणे जिल्ह्यात दौंड, बारामती आणि इंदापूरमध्ये कालपासून पावसाची संततधार सुरू आहे. बारामतीत काही घरांची पडझड झाली असून, पुरात अडकलेल्या 7 जणांना वाचवण्यात आलं आहे. 70 ते 80 कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पहाटेपासूनच बारामती, इंदापूर तालुक्यांसह पुणे जिल्ह्यातील विविध गावांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. पुणे, सातारा, सांगली, आणि कोल्हापूरच्या घाट परिसरातही पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव आणि मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, असे निर्देश अजित पवार यांनी दिले आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील राज्यातील पावसाच्या स्थितीचा सातत्याने आढावा घेत असून, संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.
मान्सूननं आज मुंबई पुण्यासह राज्याच्या अन्य काही भागात दाखल झाला असून येत्या 24 तासात मुंबई, रायगड, आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.
पुणे शहरतही आज दुपारनंतर पावसाचा जोर वाढला आहे; त्यामुळे शहराच्या  अनेक भागांत रस्ते जलमय झाले आहेत. या पावसाचा रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला असून उपनगरी रेल्वेही संथ गतीनं धावत आहेत.
हवामान खात्याने पुढील 24 तासात पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांनी सतर्क राहावं आणि स्थानिक शासकीय यंत्रणेकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचं पालन करावं असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.
पुण्याच्या खडकवासला धरणातून पाणी सोडण्याच्या आधी यंत्रणेला सज्ज होण्यासाठी दोन तास आधी सूचना देण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी जितेंद्र डुडी यांनी जलसंपदा विभागाला दिल्या आहेत.

दरम्यान पुणे जिल्ह्यात अवकाळी पावसाने पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या पावसाने पुणे जिल्ह्यात सुमारे 200 ते 300 कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा अंदाज पुणे कृषी विभागाने व्यक्त केला आहे. पाऊस ओसरल्यानंतर प्रशासनाकडून नुकसानीचा नेमका आकडा समजू शकेल.

**मसाप**

लेखनातील स्वायतत्ता जपताना साहित्यिकांनी सत्तेपुढे नतमस्तक होऊ नये, असं परखड मत हिंदी कवयित्री, समीक्षक, विचारवंत डॉ. सविता सिंह यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या एकशे विसाव्या वधार्पन दिनानिमित्त विशेष ग्रंथकार आणि वार्षिक ग्रंथ पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. ज्येष्ठ नाटककार चं. प्र. देशपांडे, ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्यासह अन्य साहित्यिकांना यावेळी गौरवण्यात आलं. साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतींच्या माध्यमातून समाजाला जागृत करणं ही काळाची गरज आहे, असं मत अमोल पालेकर यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केलं.

**प्रकाशन**

सातारा जिल्ह्यातील निढळ या गावाची प्रगतीशील वाटचाल उलगडणाऱ्या 'निढळ: ग्रामविकासाचा दळवी पॅटर्न' या पुस्तकाचं प्रकाशन ज्येष्ठ अभिनेते आणि नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर यांच्या हस्ते पुण्यात नुकतंच झालं. माजी सनदी अधिकारी आणि रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी यांच्या नेतृत्वात लोकसहभागातून निढळ हे गाव आदर्श गाव म्हणून नावारुपाला आलं आहे. चंद्रकांत दळवी यांनी साकारलेलं ग्रामविकासाचं प्रारूप सर्वत्र पोहोचावं; आणि त्यातून प्रत्येकाला ग्रामविकासाची प्रेरणा मिळावी असं प्रतिपादन नाना पाटेकर यांनी यावेळी केलं.

**शरद तांदळे**

पर्यावरण संवर्धन हे आता केवळ सामाजिक कार्य राहिलं नाही, तर या क्षेत्रात उद्योग, व्यवसायाच्या मोठ्या संधी आहेत. असं मत लेखक, उद्योजक शरद तांदळे यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. ग्रीन सोल्युशन्स संस्थेच्या 13व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याच कार्यक्रमात पर्यावरणवादी कार्यकर्ते रमेश आणि स्वाती खरमाळे या दाम्पत्याला जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील प्रमुख रस्ते अधिक सुरक्षित बनवण्याच्या दृष्टिने ‘अर्बन स्ट्रीटस्केप्स’ प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत दापोडी, निगडी प्राधिकरणासह विविध भागातील रस्त्यांवर सलगपणे चालताना पादचाऱ्यांना सुरक्षिततेबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याची

काळजी घेण्यात येत आहे. हा प्रकल्प राबवताना पथदिवे, चौकांची नव्याने रचना, सेवारस्ते याकडेही विशेष लक्ष दिलं जात आहे. रस्त्यांची कामं करताना सार्वजनिक-खासगी वाहनांबरोबरच पादचारी, सायकलस्वार यांचाही विचार केला जात असल्याचंही पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**